नाही किंवा त्या मध्ये तत्पर नाहीत.

३) ग्रामीण भागातील महिलांचे आजही ५० ...च सबलीकरण झालेले दिसून येते.

४) महिला राजकारणात येण्यास घाबरतात किंवा ... योग्य वाटत नाही. समाज मान्यता देईल की ... भितीपोटी त्या समोर येत नाही.

...:

१) शासनातर्फे महिलांना पदधारण करण्यापूर्वी ...प्रशिक्षणाच्या स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध ...व्यात.

२) महिला सबलीकरणासाठी जिल्हा व तालुका ...र काही प्रमुख समित्या नेमाव्यात.

३) ज्या महिला पदावर आहेत त्या पदाचा ... त्यांनी स्वत: करावा. त्यांच्या पती किंवा मुलाने ...शी शासनाने अट घालावी.

४) ग्रामीण महिलांचा राजकीय सहभाग ...साठी समाजाने सकारात्मक दृष्टिकोणातून पाहणे ... आहे.

५) महिलांचे सबलीकरण होऊन त्यांच्या खऱ्या ... राजकीय सहभाग वाढावा यासाठी शासनाने ठोस पाऊले उचलने गरजेचे आहे.

...:


१) द्विवेदी राकेश, महिला सशक्तीकरण चुनौतियाँ ...नीतियाँ, पुर्वाशा प्रकाशन, भोपाल, २००५

२) Status Report Government of ...arashtra, 2007-08

३) डॉ. शर्मा मालती, २०१२, नारीवादी राजनीति ... एवं मुद्दे प्रशांत बुक डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली.


❑❑❑

41

# राजकीय दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरण


प्रा.कु. पल्लवी रमेशराव देशमुख,
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,
रिसोड ता. रिसोड, जि. वाशिम


**********

पूर्वीच्या काळी महिलांचे 'चुल व मुल' एवढ्यापुरतेच क्षेत्र मर्यादित होते. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना दुय्यम स्थान दिले गेलेले आहे. तसेच सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील स्वातंत्र हिरावून घेतले गेले. परंतु काही महिला ह्या अशा परिस्थीतीत देखील कतृत्ववान सिध्द झालेल्या दिसून येतात. आजच्या परिस्थीतीमध्ये असे बघायला मिळते की, कोणत्याही क्षेत्रात स्त्रीया ह्या पुरुषपेक्षा कमी नाही उलट त्या पुरुषांच्या तुलनेत कितीतरी परीने पुढे चाललेल्या दिसुन येतात. राजकीय क्षेत्रात बघता श्रीमती इंदिरा गांधी, सोनीया गांधी व राष्ट्रपती पद ज्यांनी भुषविले त्या प्रतिभाताई पाटील, सुषमा स्वराज, ममता बॅनर्जी इ. व अशा कितीतरी महिलांनी आपले कर्तृत्व सिध्द करुन दाखविले आहे. गावातील सपंच पदापासुन ते जिल्हा परिषद या अशा वेगवेगळ्या पदावर महिला यशस्वीपणे कार्यभार सांभाळतांना दिसुन येतात. महिला ह्या पुरुषांच्या तुलनेत कमी नसून त्या बरोबरीने कार्य करु शकतात व ह्याचे श्रेय अनेक समाजसुधारकांना जाते, की ज्यांनी समाजामध्ये योग्य ती क्रांती घडवून आनली व महिलांना आपले स्थान मिळवून दिले व अशाच कर्तृत्वान महिलांच्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे

**इंदिरा गांधी :—**

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या कन्या म्हणून १९ नोव्हेंबर १९१७ रोजी इंदिराजींचा जन्म झाला. इंदिराजींचे बालपन आनंदभवन तर कधी लखनौ ला गेले. वडिलांच्या सोबत त्या राजकीय दौऱ्यावर रहायच्या

व राजकारणाचे बाळकडु त्यांना घराण्याकडुन मिळत गेले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला व सफलता प्राप्त केली. आपल्या कुशल नेतृत्वामध्ये त्यांनी देशाची सेवा केली. राष्ट्रातच नव्हे तर परराष्ट्रात देखील आपल्या राजकारणाचा ठसा उमटवला.

**सोनिया गांधी :—**

सोनिया गांधी यांचा जन्म ९ डिसेंबर १९४६ रोजी इटली मधील एका छोट्या गांवात झाला. राजीव गांधी ह्यांच्यासोबत त्यांचा विवाह झाला. राजीव गांधीच्या निधनानंतर त्यांनी राजकारणामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला २००४ च्या निवडणुकीनंतर पंतप्रधान पद स्वीकारणार नाही असे जाहीर करुन देशसेवेशी धुरा स्विकारली.

**मा. प्रतिभाताई पाटील :—**

१९ डिसेंबर १९३४ रोजी नाडगांव येथे जन्म झाला. अमरावती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविली व निवडून आल्या. स्वत: महिला असल्यामुळे महिलांच्या समस्या समजून घेवून महिलांविषयी अनेक राजकीय बदल घडवून आणले. १९ जुलै २००७ रोजी राष्ट्रपती पदासाठी झालेली निवडणूक जिंकली व देशातल्या पहिल्या राष्ट्रपती बनण्याचा मान मिळवला. साधी राहणी व उच्च विचारासाठी त्यांची होती.

तसेच सरोजनी नायडू, कमुदबेन जोशी, विजयराजे शिंदे, शशिकला काकडेकर, डॉ. नजमा हेप्र तुल्ला, मिरा कुमार, ममता बॅनर्जी या व आशा कितीतरी महिलांनी राजकारणामध्ये आपले स्थान यशस्वीरित्या निर्माण केले व राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवला.

ह्यावरुन असे लक्षात येते की, महिला ह्या राजकीय क्षेत्रात देखील मागे नाहीत.

**महिला सबलीकरण :—**

महिला सबलीकरण म्हणजेच महिलांचा विकास महिलांना समाजकारण पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्यांचे मनोबल वाढवणे म्हणजेच महिला सक्षमीकरण होय. महिलांना नेहमी दुय्यम स्थान मिळालेले आहे. परंतु शिक्षणाव्दारे तसेच बदललेल्या काळानुसार महिलांच्या या स्थितीमध्ये बदल होतांना दिसतायेत. गृह व्यवस्थापन करुन अर्थाजन करतांना सुध्दा स्त्री दिसुन येतेय, आणि हा काळाचाच महिमा म्हणावा लागेल महिलांमध्ये नेतृत्व हा गुण जर असेल तर ती कुठलेही उच्च पद भुषऊ शकते हे आपण समाजामध्ये अनेक उदाहरणांव्दारे बघु शकतो. महिलांना स्वत:च्या समस्यांची जाणीव होऊ लागल्यामुळे त्यांनी त्या समस्या सोडविण्याकरीता पुढाकार घेतलेला आहे. खऱ्या अर्थाने १९७५ च्या नंतर महिला सक्षमीकरणाला थोडीफार सुरुवात झाली व राजकारणामध्ये स्त्री पुढाकार घेवु लागली. प्रत्येक पक्ष स्त्रियांच्या सहभागाला महत्व देवु लागला. महिलांना आरक्षण लागू झाले व स्त्री ही राजकीय दृष्ट्या सक्षम होऊ लागली.

**सारांश :—**

पुरुषप्रधान संस्कृतीमधे महिलांचे स्थान उंचावण्याकरीता महिला सक्षमीकरण ही काळाची गरज बनली आहे. महिलांना तेजोमय करण्याचे काम अनेक समाज सुधारक व शासन करतांना दिसून येते व त्याचाच परिणाम आज महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्य करतांना दिसुन येत आहे, मग ते सामाजिक असो किंवा आर्थिक पुर्वी ‘चुल व मुल’ या क्षेत्रापर्यंत मर्यादित असलेली स्त्री राजकीय तसेच आर्थिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करतांना दिसुन येत आहे. गावातील सरपंच पदापासुन ते राष्ट्रपती पदापर्यंत महिला यशस्वी काम करित आहे. आपल्या राजकारणाची छाप अनेक स्त्रियांनी लोकांवर पाडली आहे. इंदिरा गांधी, सोनिया गांधी, प्रतिभाताई पाटील असे कितीतरी उदाहरणे आपणांस देता येतील, त्यांना संधी मिळाल्यास त्या आपले कतृत्व सिध्द करु शकतात. म्हणून राजकीय दृष्टीकोनातुन आपण महिला सबलीकरण बघितले आहे.

**संदर्भ :—**

१. भारतीय स्त्री जीवन व कर्तृत्व : प्रा.आर.एन.पारधी

२. समाज आणि महिला : गोऱ्हे डॉ. नीलम

३. महिला राजनिती और आरक्षण : सिंह, निशांत

४. महिला शक्तीकरण एवं समग्र विज्ञान : प्रेमनारायण शर्मा

□□□



IQAC Co-ordinator Late Pushpadevi Patil Arts & Science College, Risod Dist. Washim-444506

Late Pushpadevi ... Sci. College 722 Dist-Washim Risod

Principal Late Pushpadevi Patil Arts & Science College Risod Dist-Washim